**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २००** **दिनांक — २६/०९/२०२५**

**विभाग — आस्थापना विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — जलतज्ञ पदाची निर्मिती करणेबाबत. ( केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६)

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत मनपा आस्थापना सुचीवर Environment Engineer व Hydrologist ही पदे मुंजूरी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

शासन निर्णय क्र-अमपा-२०१२ /प्र.क्र. ३०१ (भाग-२) / नवि-२५ ६ फेब्रुवारी २०१६ अहिल्यानगर महानगरपालिकेचे सुधारीत सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधास मान्यता दिलेली असुन सदर आकृतीबंधामध्ये, १) पर्यावरण संवर्धन अधिकारी — १ पद, ( नामनिर्देशन- १००%, शैक्षणिक अर्हता- (अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पर्यावरण अभियांत्रिकी शाखेची पदव्युत्तर पदवी आणि अथवा प्रदुषण नियंत्रण क्षेत्रातील अपवादात्मक अनुभव असणा-या उमेदवारांस विशेष पसंती.

२) प्रदुषण नियंत्रण अधिकारी - १ पद (नामनिर्देशन -१००%, शैक्षणिक अर्हता — (अ) मान्यताप्रप्त विद्यापिठाची पर्यावारण शास्त्र शाखेची पदवी. (ब) पर्यावरण अभियांत्रिकी पदवीधारकांस प्राधान्य (क) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील अथवा समकक्ष आस्थापनेवरील समकक्ष पदाचा ५ वर्षाचा अनुभव असणा-या उमेदवारांस प्राधान्य.

वरीलप्रमाणे पदे मंजूर असुन सोबत सदर पदाचे सेवाप्रवेश नियमाची प्रत सादर करीत आहे. तथापी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जलतज्ञ या पदनामाचे पद मंजुर नसल्याने, जलतज्ञ वेतनक्षेणी ४१,८००-१,३२,३०० स्तर वेतन —S-15 नामनिर्देशनाने १००%

अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची पर्यावरण अभियांत्रिकी किंवा जलविज्ञान अभियांत्रिकी मध्ये बॅचलर पदवी किंवा पर्यावरण अभियांत्रिकी मध्ये पदव्युत्तर पदवी जलविज्ञान आणि जलसंपत्ती अभियांत्रिकी पदवी असणा-यास विशेष पसंती.

ब) मा. शासनाकडील / स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये / पर्यावरण संबधीत क्षेत्रामधील सबंधीत कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. या पदाच्या निर्मितीस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्तावास मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशीस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २०१** **दिनांक – २६/०९/२०२५**
**विभाग – सार्व. बांधकाम विभाग**

---

प्रस्तावाचा विषय – अहिल्यानगर येथील सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक या रस्त्यास " **माजी आमदार स्वर्गीय अरूणकाका बलभिमराव जगताप ( काका )** '' यांचे नांव देणे बााबत

--**--

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, मा. आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार व दि. १२/०८/२०२५ रोजी उपअभियंता यांचे मा. आयुक्त साहेब यांचे समवेत झालेल्या चर्चे नुसार रस्ते, चौक मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव देणे बाबत मानक कार्यपध्दती (S.O.P) तयार करणे बाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार मानक कार्यपध्दती (S.O.P) तयार करण्याचे काम चालू आहे. परंतु मा. आयुक्त साहेब यांच्या वेळोवेळी दिलेल्या तोंडी निर्देशानुसार रस्ते, चौक, मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

वरील संदर्भन्वये अहिल्यानगर जिल्हयाचे माजी आमदार व शहराचे माजी नगराध्यक्ष " माजी आमदार स्वर्गीय अरूणकाका बलभिमराव जगताप '' यांची राजकीय, सामाजीक, शैक्षणिक कारकिर्द सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक या भागापासून सुरू झालेली होती म्हणून आम्ही स्वर्गीय श्री. अरूणकाका बलभिराव जगताप यांचे नांव कायम स्वरूपी समरणत रहावे यासाठी सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक या रस्त्यास " **माजी आमदार स्वर्गीय अरूणकाका बलभिमराव जगताप ( काका )** '' यांचे नांव देणे बाबत प्रा.श्री. माणिक विधाते व इतर यांनी मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रसताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद खलील प्रमाणे आहे.

१. अनुसची ड, प्रकरण ११ मधील २ रस्त्यांना नावे देणे आणि (जागांना) क्रमांक देणे १ अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या केणत्याही रस्ता किंवा सार्वजनिक ठिकाण ज्या किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल, ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.
२. प्रकरण -२९ नियम, उपविधी विनियम व स्थायी आदेश मधील कलम ४५७ या बाबीसाठी नियम, करता येतील त्या बाबी मधील अ,क्र. १० रस्ते मधील क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि ( जागांचा क्रमांक देणे ) याबाबींसाठी नियम करता येईल.

यास्तव अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक या रस्त्यास " **माजी आमदार स्वर्गीय अरूणकाका बलभिमराव जगताप ( काका ) मार्ग** '' असे नामकरण करणेस व खर्चास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक — २०२** **दिनांक — २६/०९/२०२५**

**विभाग — सार्व. बांधकाम विभाग**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

प्रस्तावाचा विषय —जुना अप्पु हत्ती चौकाचे नाव बदलून त्या चौकाला " **क्रांतीगुरू लहूजी वस्ताद साळवे**" असे नामकरण करणे बाबत

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, मा. आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार व दि. १२/०८/२०२५ रोजी उपअभियंता यांचे मा. आयुक्त साहेब यांचे समवेत झालेल्या चर्चे नुसार रस्ते, चौक मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव देणे बाबत मानक कार्यपध्दती (S.O.P) तयार करणे बाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार मानक कार्यपध्दती (S.O.P) तयार करण्याचे काम चालू आहे. परंतु मा. आयुक्त साहेब यांच्या वेळोवेळी दिलेल्या तोंडी निर्देशानुसार रस्ते, चौक, मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

वरील संदर्भान्वये जुना अप्पु हत्ती चौकाचे नाव बदलून त्या चौकाला " **क्रांतीगुरू लहूजी वस्ताद साळवे** " असे नामकरण करणेबाबत श्री. अंकुश मोहिते व इतर, सकल मातंग समाज, अहिल्यानगर यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद खालील प्रमाणे आहे.

१) नुसूची ड, प्रकरण ११ मधील २ रस्त्यांना नावे देणे आणि ( जागांना ) क्रमांक देणे १ अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल, ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

२) प्रकरण -२९ नियम, उपविधी विनियम व स्थायी आदेश मधील कलम ४५७ या बाबीसाठी नियम, करता येतील त्या बाबी मधील अ,क्र. १० रस्ते मधील क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि ( जागांचा क्रमांक देणे ) याबाबींसाठी नियम करता येईल.

३) अप्पू हत्ती चौक ते लालटाकी सर्जेपुरा या रस्त्याला नांव देणे बाबतचा प्रस्ताव " **क्रांतीगुरू लहूजी वस्ताद साळवे** " असा आलेला होता. सदरचा प्रसताव कार्यवाहीमध्ये आहे. परंतु सदरच्या रस्त्याच्या मालकीबाबत व नांव देणे बाबतचा शासन निर्णय क्रमांक टीआरएस २००५ प्र.क्र.१ रस्ते १ दि. ११ एप्रिल २००५ शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील ३.३०० कि.मी. लांबीचे रस्ते दुरूस्ती व देखभालीसाठी हस्तांतरीत बाबत, असे नमुद आहे की, रस्त्याच्या अर्जा नुसार विहीत पथकिणा- यावती नियमांचे पालक करण्याची जबाबदारी मपाची राहील तसेच सदरहू स्वयपाचे बांधकाम अथवा पथकिणा-या वरील क्षत्रात पुतळा,स्मारक, बोधचिन्ह अथवा तत्सम स्वरूपाचे बांधकाम अथवा वास्तुशिल्प उभारता येणार नाही अथवा कोणत्याही मान्यवर व्यक्तीचे नांवे देता येणार नाही, अशी अट आहे.

यास्तव अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील पत्रकार चौक ते सर्जेपुरा ते कोठला मनपाकडे हस्तांतरीत झालेला असला तरी वरील शासन निर्णयास्तव रस्त्याला नाव देता येणार नाही. परंतु नेहरू पुतळा समोरील जुना अप्पु हत्ती चौक ते दिल्लीगेट हा रस्ता मनपाच्या मालकी आहे तरी नेहरू पुतळा समोरील जुना अप्पू हत्ती चौकाचे " **क्रांतीगुरू लहूजी वस्ताद साळवे** " असे नामकरण करणेस व खर्चास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २०३** **दिनांक – २६/०९/२०२५**

**विभाग – सार्व. बांधकाम विभाग**

---

प्रस्तावाचा विषय- कराचीवाला नगर या रहिवासी क्षेत्राचे नांव बदलून " **अयोध्या नगर** " करणे बाबत

--**--

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, रिपोर्ट सादर की, मा. आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार व दि.१२/०८/२०२५ रोजी उपअभिंयता यांचे मा.आयुक्त साहेब यांचे समवेत झालेल्या चर्चे नुसार रस्ते, चौक, मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव देणे बाबत मानक कार्यपध्दती (S.O.P) तयार करणे बाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार मानक कार्यपध्दती (S.O.P) तयार करण्याचे काम चालू आहे. परंतु मा आयुक्त साहेब यांच्या वेळोवेळी दिलेल्या तोंडी निर्देशानुसार रस्ते, चौक, मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव देणे बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

वरील संदर्भान्वये सद्यस्थितीमध्ये रहिवासी क्षेत्राचे नाव कराचीवाला नगर असून येथील सर्व रहिवाश्यांची अहिल्यानगर येथील कराचीवाला नगर नाव बदलून " **अयोध्या नगर** " असे नांव देणे बाबत कराचीवाला नगर येथील रहिवासाी यांनी संदर्भिय पत्र देवून मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद खालील पत्र देवून प्रमाणे आहे.

४) अनुसूची ड, प्रकरण ११ मधील २ रस्त्यांना नावे देणे आणि ( जागांना ) क्रमांक देणे १ अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल, ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

५) प्रकरण -२९ नियम, उपविधी विनियम व स्थायी आदेश मधील कलम ४५७ या बाबीसाठी नियम, करता येतील त्या बाबी मधील अ.क्र. १० रस्ते मधील क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि ( जागांचा क्रमांक देणे ) याबाबींसाठी नियम करता येईल.

यास्तव अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील कराचीवाला नगर या भागाचे नांव बदलून " **अयोध्या नगर** " असे नामकरण करणेस व खर्चास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६२ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २०४** **दिनांक — २६/०९/२०२५**

**विभाग — सार्व. बांधकाम विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — अधिनियम तरतुद वापयन महानगरपालिकेचे जागा/रस्ते/इमारती/सार्वजनिक ठिकाणे/इ.नांव देणे बाबत मानक कार्यालयीन पध्दत ( Standard Oprating Procedure ) { S.O.P }तयार करणे बाबत

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी नुसार जागा/रस्ते/इमारती/सार्वजनिक ठिकाणे/इ.नांव देणे बाबतची तरतूद महानगरपालिका अधिनियम खालील प्रमाणे आहेत.

१) अनुसूची ड, प्रकरण ११ मधील २ रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे अ महानगरपालिका मंजूरीने महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या कोणकोणत्या रस्ता किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

२) प्रकरण -२९ नियम, उपविधी विनयिम व स्थायी आदेश मधील कलम ४५७ या बाबीसाठी नियम, करता येतील त्या बाबी मधील अ.क्र. १० रस्ते मधील क नुसार रस्त्यानां आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि ( जागांचा क्रमांक देणे ) या बाबींसाठी नियम करता येईल.

परंतु प्रयक्षात विविध राजकीय, अराजकीय, विविध नागरिक संस्था, या रस्त्यांना, इमारतीना व चौकांना नांव देणे बाबत मागणी करतात परंतु सदर नांव देण्यापूर्वी मनपा मार्फत केणतीही प्रचलित कार्यपध्दती नाही.त्यामुळे विविध वादग्रस्त अथवा एकाच ठिकाणी अनेक प्रकारचे नांवे देणे हा प्रकार झालेला आहे. सदर प्रकार होवू नये या प्रकारच्या वारंवारता करिता व योग्य पध्दतीने व्हावा या करिता मानक प्रचलित कार्यपध्दती राबविण्यासाठी मान्य आहे.

मा. आयुक्त साहेब यांचेशी झालेल्या चर्चेनुसार रस्ते,चौक,मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणाना नांव देणे बाबत एसओपी तयार करणे बाबत आदेशित करण्यात आले आहे.

त्यानुसार बांधकाम विभागातील शहर अभियंता व उपअभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली खालील मसुद्या प्रमाणे

A) छाननी- अधिनियम तरतूद नूसार खालील पुर्ततेची मान्यता घेणे

१) नाव देणे करीताचा मागणी दिनांक

२) मागणी संख्या / प्रतिनिधी

३) मागणी ठिकाणाचे वर्णन

४) मागणी ठिकाणचा नकाशा

५) मनपाची अधिनियम तरतुदीनुसार — योग्य / अग्योग्य

६) योग्य असल्यास तरतुद

७) आयोग्य असल्यास स्वयस्पष्ट

८) मागणी ठिकाणची मालकी महानगरपालकेची आहे / नाही

९) मागणी ठिकाण मालकी असल्यास त्याबाबत मनपाचे नगर रचना विभागाचा अभिप्राय

१०) मागणी केलेल्या ईमारतीचे बांधकाम झालेचे वर्ष / निधी

B) प्रत्यक्ष कार्यवाही-

१) महसुल विभाग, मनपाचे प्रभाग समिती कार्यालय, पोष्ट विभाग, पोलिस प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय इत्यादी विभागाने नाव देणेबाबत ना हरकत दाखला मागविणे.

२) रस्ते, चौक, मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना ज्याव्यक्तीचे नांव द्यावयाचे आहे व्यक्ती चे पुर्व इतिहास व त्या संबंधीचे पुरावे, त्यानी केलेले उल्लेखनिय व समाज उपयोगी कामे व पुरावे.

३) प्रथम शहर अभियता स्तरावर स्थानिक वृतपत्र-१ जिल्हास्तरीय मराठी वृत्तपत्र-१ मध्ये मागणी ठिकाणबाबत हरकती मागविणे. तसा शहर अभियंता यांना अधिकार देवुन त्याकामी येणा-या खर्चास मान्यता गृहित धरणे.

४) महानगरपालिका पॅनेल वरील न्यायिक अभिप्राय हरकती सुनावणी अंतिक होणे पुर्वी घेणे

५) सदर हरकती असल्यास मा. उपायुक्त (सा) यांचेकडे सुनावणी घेणे

वरिल मसुद्या प्रमाणे मानक प्रचलीत कार्यपध्दती नांव देणे बाबत, सदर कार्यपध्दतीस तथा आवश्यकतेस व मानक या पुढे राबविणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका